ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
January-June 2022- Vol. 11 No. 1

# पर्यावरण व सामाजिक समस्या

**डॉ. प्रकाश सुर्यभान सोनक**
*विभागप्रमुख, समाजशास्त्र*
*यशोदा गर्ल्स आर्टस् ॲन्ड कॉमर्स कॉलेज, नागपूर.*

***प्रस्तावना***

*पर्यावरण शास्त्र हे आता मानवी जीवनाचा एक अविभाज्य अंग बनलेले आहे. कोणताही मानवप्राणी हे नाकारू शकत नाही. कारण मानवी जीवनाची सुदृढता जर कायम राहील तरच मनुष्य अधिक काळापयर्यंत टिकून राहू शकेल आणि त्याकरिता आपल्याला आपल्या जीवीनाला स्वच्छ आणि सुंदर ठेवायचे असेल तर सर्वप्रथम पर्यावरणाला जीवंत ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. पर्यावरणाच्या बाबतीत आपण अजूनही फार अनभिज्ञ आहोत आणि म्हणूनच आपल्या समोर आज पर्यावरण ही एक ज्वलंत सामाजिक समस्या ठरली आहे. या समस्येला जन्म आपणच दिलेला आहे. कारण आपणच अनेक प्रकारचे उपद्रव आपल्या दैनंदिन जीवनात निर्माण करीत असतो. जे वातावरणाकरिता किंवा निसर्गाला नको असणारे कार्य आपण सुडबुध्दीने करून आपण आपल्या आजूबाजूच्या चांगल्या पर्यावरणात्मक वातावरणाचा नाश करतो म्हणून आपल्यापुढे पर्यावरणात्मक सामाजिक समस्या दर दिवसाला वाढत असलेल्या दिसून येतात.*

**टिकाऊ विकास प्रक्रिया**

आर्थिक मूल्यांवर आधारित विकास प्रक्रियेमुळे जीवनस्तर व लोकांच्या राहणीमानात सुधारणा घडून येवू शकत नाही. कारण पर्यावरणाची मोठया प्रमाणात हानी होत असते. सुमारे सत्तरच्या दशकात केवळ आर्थिक विकासामुळे लोकांचा जीवनस्तर सुधारू शकणार नाही. हे नियोजनकर्त्यांना समजून चूकले व त्यासाठी पर्यावरणाची स्थिती सुधारण्यासाठी गरज असल्याचे स्पष्ट झाले. ज्या विकास आराखडयात केवळ आर्थिक विकासावर भर देण्यात आला होता अशा विकास प्रकल्पांवर हवा व पाणी यांच्या प्रदूषणामुळे विपरित परिणाम होऊ लागला.

**गांधीजोचे पर्यावरण विषयक विचार/तत्वे**

राष्ट्रपिता महात्मा गांधीनी अनेक वर्षापूर्वी योग्य पर्यावरण नियोजन असलेल्या खेडयांची संकल्पना मांडली होती. गावातील रस्ते सुंदर व स्वच्छ असावेत असे त्यांचे विचार होते. औद्योगिक प्रक्रियेद्वारे निर्माण होणाऱ्या वस्तूऐवजी खेडयातील कुटीरोद्योगाद्वारे निर्मित वस्तूंचा वापर करण्यावर त्यांचा अधिक भर होता.

गांधीजीनी मांडलेली पर्यावरण संबंधीची ही तत्वे आज दूरगामी टिकाऊ पर्यावरण नियोजनाचा प्रमुख घटक मानली जातात. गांधीजीनी वैयक्तिक स्तरावर अशी पर्यावरणस्नेही टिकाऊ जीवनशैली अंगीकारली होती. स्टॉकहोम येथे 1972 साली भरलेल्या पहिल्या पृथ्वी परिषदेत गरीबी हे सर्वात मोठे प्रदूषण असल्याचे मत इंदिरा गांधीनी मांडले होते. मानवी जवीनशैली सुधारून जगभरातील सर्व लोकांच्या कल्याणासाठी प्रयत्न करण्याच गरज आहे. एवढेच नव्हे तर येणाऱ्या भावी पिढयांचाही आपण विचार करण्याची गरज निर्माण होत आहे.

धरणे, खाणकाम, रस्ते बांधणी तसेच औद्योगिक वा पर्यटन विषयक विकास प्रक्रियेद्वारे पर्यावरणावर परिणाम होतो. या विकास प्रकल्पाचा पर्यावरणावर प्रभाव ही कामे सुरू करण्याआधी विचारात घेणे आवश्यक असते. कोणताही प्रकल्प सुरू होण्याआधी या प्रकल्पाचा पर्यावरणावर प्रभाव होईल याचा शास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करून मगच अशा प्रकल्पांना मंजूरी देण्यात यावी.

**शहरी भागातील उर्जा समस्या**

शहरी भागात प्रचंड प्रमाणात उर्जेचा वापर केला जातो. आधुनिक घर बांधणीत वापरल्या जाणाऱ्या सिमेंट–कॉक्रीट, लोखंड व काचेच्या वापरामुळे घरातील तापमान नियंत्रित होऊ शकत नाही. 1970 च्या सुमारास लाकडे, कोळसा व रॉकेलऐवजी विजेचा व नैसर्गिक वायूचा वापर इंधन म्हणून करण्याची सुरूवात झाली. पूर्वी वापरात असलेल्या पंख्याची जागा आता वातानुकूलित यंत्रानी घेतली ओह. या यंत्राकरिता अधिक प्रमाणात उर्जेची गरज असते. शहरी भागातील गगनचुंबी उंच इमारतीत (लिफ्टचा) वापर तसेच अधिक दिवे लावल्यामुळे उर्जेचा वापर अधिक प्रमाणात होतो. शहरी भागातील वाहतुकीसाठी प्रामुख्याने खनिज इंधनाची आवश्यकता असते. शहरी भागातील लोक स्वतःचे वाहन वापरणे अधिक पसंत करतात. त्यामुळे रस्त्यांवर अधिक वाहने येतात. वाहनांच्या धुरामुळे कार्बन मोनॉक्साईडचे प्रमाण वाढते. वातावरण प्रदूषित झाल्याने अधिक लोकांना श्वसनाचे विकार होतात.

**जलसंवर्धन**

पाण्याचा अपव्यय टाळणे पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून निकडीचे आहे. जगभर स्वच्छ पाणी उपलब्ध न होण्याची समस्या निर्माण होत आहे. वनांचा ऱ्हास झाल्यामुळे पावसाचे पाणी जमिनीच्या पृष्ठभागावरून वाहत जाते व भूगर्भीय जलस्तर घटत जातो. पावसाचे पाणी जमिनीत टिकवून न ठेवू शकल्यामुळे पूरांची गंभीर समस्या निर्माण होते. पुरामुळे अनेकांचे आयुष्य उद्‌ध्वस्त होते व जीवित तसेच मालमत्तेची प्रचंड हानी होते. आज पाण्याच्या अपव्ययाचा फटका मानव भोगत आहे. पिण्याच्या पाण्याचे संकट निर्माण झाले आहे. मानवी कल्याणासाठी जलसंवर्धन करणे अत्यंत गरजेचे आहे. शहरी भागातील लोक मोठया प्रमाणात पाण्याचा गैरवापर करतात. गळणाऱ्या पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा करताना 50 टक्के पाणी वाया जाते. पाण्याची बचत करणे हाच पाणी प्रश्न सोडविण्याचा मार्ग आहे.

**पुनर्वसन समस्या व त्यासंबंधीत प्रश्न**

धरणे, खाणी, द्रुतगती मार्ग यासारखे विकास प्रकल्प किंवा परिसर 'राष्ट्रीय उद्याने' म्हणून घोषीत करण्याची सूचना

स्थानीक लोकांचे जीवन विकसित करते. स्थानीक लोकांचे इतर योग्य ठिकाणी पूर्नवसन करणे आवश्यक असते. लोकांचे स्थलांतर व पुनर्वसन ही आज एक गंभीर समस्या आहे. नर्मदा प्रकल्पात आपली जमीन वाचविण्यासाठी स्थानिक लोकांनी संघर्ष केला आहे. आपली जमीन वाचविण्यासाठी येथील स्थानिक लोक गेली अनेक दशके लढा देत आहेत. लोकांच्या मनात असलेला असंतोष नर्मदा बचाव आंदोलनाच्या रूपाने पुढे आलेला आहे.

**वातावरणातील बदल**

गेल्या काही दशकात अनेक प्रदेशाचे तापमान वाढत आहे. 1998 हे वर्ष पृथ्वीच्या पर्यावरणीय इतिहासातील सर्वाधिक उष्ण वर्ष म्हणून गणले गेले. गेल्या काही दशकात आशिया व आफ्रिका खंडातील काही देशात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली. गेल्या शंभर वर्षाच्या तुलनेत 1970 पासुन आजपर्यंत वादळाचे प्रमाण वाढले आहे. पृथ्वीचे वातावरण बदलून मानवी अस्तित्वासाठी ते अधिकाधिक गंभीर होत आहे. पृथ्वीवरील महासागरांच्या पातळीत लक्षणिय वाढ होऊन इ.स. 2100 साली सागरांची सरासरी पातळी 9.88 से.मी. वाढण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. समुद्राची पातळी वाढल्यामुळे तसेच खारे पाणी जमिनीवर पसरल्यामुळे अनेक पर्यावरणीय समस्याचा सामना करावा लागेल.

वातावरणातील बदलांमुळे रोगजंतू पसरविणाऱ्या कीटकांचा प्रादूर्भाव वाढतो. डासांचा व माशांचा उपद्रव वाढल्यामुळे मलेरिया, फायलेरीया यासारखे भीषण रोग पसरतात. वातावरणातील बदलांमुळे या रोगांचा फैलाव विस्तृत भागात होत जातो. डासांपासून होणारे डेंग्यू, पीतज्वर तसेच पिसवांपासून होणारे लाईम रोग व मेंदूज्वरासारखे आजार फैलावतात.

**चंगळवाद**

आधुनिक समाजात अधिक प्रमाणात ग्राहकोपयोगी वस्तूंचा वापर केला जातो. विशेषतः 'वापरा व फेका' या सूत्रावर आधारित केवळ एक वेळ वापरून फेकून देण्यात येणाऱ्या वस्तूंच्या वापरामुळे संसाधनांची अधिक प्रमाणात नासाडी होत आहे. औद्योगिकदृष्ट्या प्रगत राष्ट्रातील 20 टक्के जनता जगातील 40 टक्के नैसर्गिक संसाधनांचा वापर करीत आहे व जगातील एकूण टाकाऊ पदार्थापैकी 40 टक्के टाकाऊ पदार्थ या देशात निर्माण होत आहेत.

प्रत्येक व्यक्ती, कुटुंब व प्रत्येक देशात नैसर्गिक संसाधनांचा अधिक वापर होत गेला तर त्याचे परिणाम गंभीर होतात. उदाहरणार्थ प्रगत राष्ट्रात दरवर्षी 200 कोटी कॅन्स, बाटल्या, प्लॅस्टिक कॉर्टून्स व प्लॅस्टिक कप कचरा म्हणून ठेवले जातात. एकदा वापरून फेकून देण्यात येणाऱ्या ग्राहकोपयोगी वस्तूंमुळे कचऱ्याचे प्रमाण वाढले आहे.

गरजेशिवाय उत्पादनांची खरेदी करणाऱ्या वृत्तीला चंगळवाद असे म्हणतात. अशा उत्पादनाची खरेदी भडक जाहिरातीमुळे केली जाते. चंगळवादामुळे संसाधनांचा वापर टिकाऊ पध्दतीने करण्यावर विपरीत परिणाम होतो. ग्राहककेंद्री समाजामुळे निर्माण होणाऱ्या प्रचंड कचरा ही जगभर एक मोठी समस्या बनत आहे.

शहरी व ग्रामीण भागात या कचऱ्याच्या व्यवस्थापनाच्या समस्या सर्वस्वी भिन्न आहेत. आधुनिक औद्योगिक समाजरचनेमुळे ग्राहकोपयोगी वस्तूंची औद्योगिक स्तरावर निर्मिती केल्यामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट कशी लावायची ही एक मोठी समस्या आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे कचऱ्याचे प्रमाण प्रचंड वाढल्याने कचरा निर्मूलन व्यवस्थापनावरील ताण कित्येक पटींनी वाढला आहे. समाजात कचऱ्याची निर्मिती होणे अपरिहार्य असले तरी मूळात आपण कचऱ्याची निर्मिती कमीत कमी होईल यासाठी आवश्यक तेवढया संसाधनाचा वापर केला पाहिजे. प्रत्येक व्यक्तीने कमीत कमी कचरा निर्मितीचे किंबहूना शूनय कचरा निर्मितीचे ध्येय ठेवण्याची गरज आहे.

**पर्यावरण (संरक्षण) कायदा – 1986**

1986 साली अंमलात आलेला पर्यावरण (संरक्षण) कायदा ही एक महत्वपूर्ण तरतूद आहे. हा कायदा अंमलात आणण्यामागे आंतरराष्ट्रीय पार्श्वभूमी आहे. इ.स. 1972 साली जून महिन्यात स्टॉकहोम येथे आयोजित पहिल्या पृथ्वी परिषदेद्वारा प्रस्तुत घोषणापत्रानुसार भारत सरकारद्वारे पर्यावरणासंबंधी कायदा तयार करून तो अमलात आणला. पर्यावरणाची ढासळलेली स्थिती लक्षात घेऊन पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी या कायद्याची अंमलबजावणी करण्यात आली. आज पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी व्यापक स्तरावर कायदा उपलब्ध असूनही पर्यावरणाची हानी सतत होत आहे. पर्यावरण संरक्षण कायदा 1986 ची अंमलबजावणी करण्यासाठी लोकांचा सहभाग व पाठिंबा असणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी पर्यावरणभिमुख माध्यमे, योग्य प्रशासक, जागरूक नियोजनकर्ते, जाणीव असलेली न्यायसंस्था व प्रशिक्षित मनुष्यबळ असल्यास पर्यावरणाची हानी रोखणे शक्य होईल आणि ही जबाबदारी आमची सर्वांची आहे.

**वायु (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) कायदा – 1981**

वायु (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) कायदा सरकारद्वारे 1981 साली प्रदूषणाची समस्या रोखरण्यासाठी अमलात आणण्यात आला. या कायद्याद्वारे प्रदूषण करणारे उद्योग, वाहने, उर्जा निर्मिती केंद्रे यासारख्या वायू प्रदूषणाच्या स्त्रोतांद्वारे वातावरणात तरंगते कण, शिसे, कार्बन, मोनोक्साईड, सल्फरडाय ऑक्साईड, नायट्रोजन ऑक्साईड, ज्वलनशील सेंद्रीय पदार्थ, विषारी घटक वातावरणात सोडण्यावर बंदी घालण्यात आली आहे.

**जल (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) कायदा – 1974**

या कायद्याद्वारे औद्योगिक शेती व घरगुती वापरातील सांडपाण्याचे प्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना करता येते. प्रदूषित पाणी जलसाठयात सोडले गेल्यामुळे जलसाठे प्रदूषित होतात. या प्रदूषणामुळे अनेक आरोग्य विषयक समस्या निर्माण होऊ शकतात. सरकारद्वारे प्रदूषण नियंत्रण महामंडळाला अधिकार देण्यात आले आहेत. केंद्रिय प्रदूषण नियंत्रण बोर्डाद्वारे व्यापक स्तरावर जनजागृती कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात येते. राज्य प्रदूषण नियंत्रण बोर्डाकडे राज्य सरकारला जल प्रदूषण रोखण्यासंबंधी सल्ला देण्याचे अधिकार असतात. या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती व संस्थावर राज्य